***पीएनपी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन संपन्न ...***

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व अर्थशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन दृकश्राव्य माध्यमातून आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते लायन श्री.संदीप दत्तात्रेय वारगे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.ओमकार पोटे, प्रा.रसिका म्हात्रे, प्रा. वृषाली घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

सध्याच्या कोविड-19 मुळे शासनाचे नियम पाळून आभासी म्हणजेच ऑनलाईन पद्धतीने हे या दिनाचे आयोजन आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकेमध्ये महाविद्यालयामध्ये 25 जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन राबवण्याचे महत्व पटवून दिले. तर कार्यक्रमाचे विशेष अतिथी लायन संदीप वारगे यांनी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश त्यामधील तरुण विद्यार्थांची भूमिका स्पष्ट करत विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. मतदारांनी विशेषतः नवमतदारांनी मतदार यादीत नाव नोंदणी कशी करावी याविषयी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षीय वक्तव्यात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ओमकार विनायक पोटे यांनी या दिनाच्या पार्श्वभूमीवर सुजाण व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी महाविद्यालयातील तरुण वर्ग कशाप्रकारे समाविष्ट होऊ शकतो याची माहिती दिली आणि मतदानाच्या दिवशी घरीच न थांबता एक सुजाण नागरिक म्हणून आपण मतदान केले पाहिजे अशी विद्यार्थ्यांकडून आशा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी लायन वारगे यांनी मतदान विषयक जनजागृती संदर्भात शासनाच्या परिपत्रकातील शपथ विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमाच्या दरम्यान सलोनी बाळकृष्ण शिर्सेकर, सिद्धी रमाकांत म्हात्रे व प्रत्यूष उपेंद्र काते , यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि आम्ही मतदानाचा हक्क आणि अधिकार बजावणारच अशी ग्वाही त्यांनी आपल्या भाषणातून दिली.

संपूर्ण कार्यक्रम आजीवन विस्तार विभाग तसेच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाच्या प्रा. वृषाली प्रवीण घरात यांनी केले, तर आभार अर्थशास्त्र विभागाच्या प्रा.संजीवनी मोकल यांनी मानले.